## गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२२२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २६ नोव्हेंबर, २००७.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ८ नोव्हेंबर, २००७ (गुरुवार) रोजी झालेल्या २२२ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२६.११.२००७
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर,<br>"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,<br>मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे,<br>ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,<br>सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,<br>नागपूर - ४४० ०१५. | - | सदस्य |
| श्री.हरिशंकरन्,<br>कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,<br>इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,<br>वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई - ४०० ०५१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

**निमंत्रित :**

प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २२२ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **८ नोव्हेंबर, २००७ (गुरुवार)** |
| **वेळ** | : | **सकाळी ११.३० वाजता** |
| **सभास्थान** | : | **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.स्वाधीन क्षत्रीय<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.जी.एस.गील<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

..२/-

**निमंत्रित :**

श्री.टी.सी.बेंजामिन
प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.श्रीकांत सिंह
अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे),
बृहन्मुंबई महानगरपालिका
(महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.सुरेंद्र जाधव
उपसचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन
(सचिव, पर्यावरण विभाग यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.मिलिंद म्हैसकर
सह महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

डॉ. सतीश बागल
मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

कु.उमा अडसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.डी.डी.भिडे
मुख्य अभियंता,
मिठी नदी कामे
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.मो.रामचंदानी
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ८ ऑक्टोबर, २००७ रोजी झालेल्या २२१ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या (१) दिनांक १३ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या २२० व्या व (२) दिनांक ८ ऑक्टोबर, २००७ रोजी झालेल्या २२१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवरील कार्यवाही अहवाल.**

**२.१ प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १३ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या २२० व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल**

कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :-

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ मार्च, २००७ रोजी झालेल्या २१९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड यांनी एप्रिल - मे, २००७ मध्ये मिठी नदीच्या वांद्रे-कुर्ला संकुलामधील भागासाठी तयार

केलेले नकाशे आणि प्राधिकरणाने नियुक्त केलेले मे.युनिक इंजिनिअर्स यांनीही एप्रिल - मे, २००७ मध्ये सर्वेक्षण करुन तयार केलेले नकाशे तपासले असता त्या दोन्ही नकाशांमधील सामान्य बाबी जुळत असल्याचे दिसून आले आहे.

यासंबंधात श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, मे.युनिक इंजिनिअर्स यांनी तयार केलेले नकाशे महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाकडे पाठवून तपासून घ्यावेत.

अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर सूचनेस मान्यता दिली.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

२.२ **प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ८ ऑक्टोबर, २००७ रोजी झालेल्या २२१व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी सम्तिीने घेतली.

२.३ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निदेश दिले की, प्राधिकरणाने सध्या हाती घेतलेल्या सर्व कामांच्या प्रगतीसंबंधीचे सादरीकरण कार्यकारी समितीच्या या पुढील सर्व बैठकींमध्ये करण्यात यावे तसेच या सादरीकरणाची प्रत बैठकीच्या बाब टिप्पण्यांसोबत देण्यात यावी.

**बाब क्र.३ : मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत एस.व्ही.रोड ते पश्चिम द्रुतगती महामार्ग दरम्यान सांताक्रुझ येथील मिलन सबवे लगत भूयारी मार्गासहित रस्ते सुधारणा आणि रेल्वे ओलांडणी पूल बांधणे या कामाच्या निविदेला मान्यता मिळणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पश्चिम उपनगरातील सांताक्रुझ पूर्व व पश्चिम भागांना जोडणारा तसेच पश्चिम रेल्वेखालून जाणारा मिलन भूयारी मार्ग हा अत्यंत अरुंद व सखल भागात असल्यामुळे तसेच पावसाळयात या भूयारी मार्गात

..५/-

पाणी साचत असल्यामुळे त्या ठिकाणी सतत वाहतूकीची कोंडी होते. म्हणून वाहतूकीचे अडथळे दूर करण्याच्या हेतूने एस.व्ही.रोड ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत मिलन भूयारी मार्गालगत पश्चिम रेल्वेवरुन उड्डाणपूलाचे बांधकाम तसेच रस्ते सुधारणा ही कामे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाची आहेत. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, बृहन्मुंबईच्या विकास आराखडयातील संरेखनानुसार या उड्डाणपूलाचे बांधकाम करावयाचे झाल्यास सुमारे १००० पेक्षाही जास्त बांधकामे बाधित होतील. म्हणून प्रकल्पबाधितांची संख्या कमीत कमी करण्याच्या उद्देशाने विकास आराखडयातील संरेखनाच्या दक्षिणेस सध्याच्या रस्त्यावर उड्डाणपूलासाठी नव्याने संरेखन तयार करण्यात आले असून या नवीन संरेखनामुळे केवळ सुमारे ६८ बांधकामे बाधित होतील. या नवीन संरेखनासंबंधात बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांच्यासमवेत तसेच त्या भागातील लोकप्रतिनिधींशी चर्चा केली असून त्यांनी सदर नवीन संरेखनास मान्यता दिलेली आहे. तसेच या नवीन संरेखनानुसार विकास आराखडयातील प्रमाणशीर संरेखनात (Regular Line) सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाच्या राजपत्रात तसेच वर्तमानपत्रात अधिसूचना प्रसिध्द करुन जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहेत. त्यानंतर प्रमाणशीर संरेखनात सुधारणा करण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता घेण्यात येईल.

३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सुरुवातीस या कामाचा अंदाजित खर्च रु.३१.२७ कोटी इतका होता. त्यानुसार या कामासाठी जुलै, २००७ मध्ये निविदा मागविण्यात आल्या असता केवळ एकाच कंत्राटदाराने अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.१२% जास्त दराची निविदा सादर केली होती. सदर निविदा अवाजवी असल्यामुळे रद्द करण्यात आली. दरम्यानच्या काळात या कामाच्या प्रस्तावात बदल करुन पूलाचे पोचमार्गाच्या भरावाचे काम टप्प्याटप्प्याने करण्याकरीता सॅक्रिफिशियल वॉल (Sacrificial wall) बांधणे तसेच पाण्याच्या निच-यासाठी गटारांची लांबी वाढविणे या बाबी समाविष्ट करण्यात आल्या. त्यामुळे या कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.३४.६० कोटी इतका झाला. त्यानुसार सदर कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन फेरनिविदा मागविण्यात आल्या. एकूण ५ कोरे निविदा संच विकले गेले. त्यापैकी विहित कालावधीमध्ये जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.८३% जास्त दराची

..६/-

फक्त एकच निविदा प्राप्त झाली. यासंबंधात जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स यांचेसमवेत वाटाघाटी केल्या असता त्यांनी सादर केलेला सुधारीत देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९४% जास्त दराचा म्हणजे रु.४१.५० कोटी इतका आहे. सदर काम अवघड स्वरुपाचे असल्यामुळे केवळ एकच निविदा प्राप्त झाली आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा निविदेतील दराच्या अधिक्यासंबंधी कंत्राटदाराने दिलेले स्पष्टीकरण नमूद करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पश्चिम रेल्वेच्या मागणीनुसार मुख्य पूलाची रुंदी १७.२० मी. वरुन १९.०० मी. अशी वाढविण्यात आली तसेच रेल्वे प्रशासनाच्या नियमानुसार रेल्वेच्या भागामध्ये करावयाच्या बांधकामाच्या किंमतीचे १९.५०% प्रमाणे कोडल चार्जेस निविदाकाराने रेल्वेकडे भरणा करणे आवश्यक आहे. या दोन्ही बाबी कामाच्या अंदाजपत्रकीय दरात समाविष्ट केलेल्या नव्हत्या. त्याचप्रमाणे निविदाकाराने मुख्य पूलाचे आर.सी.सी. संकल्पचित्र व त्याची तपासणी स्वखर्चाने करावयाची असते. तसेच प्रस्तावित उड्डाणपूल हा अत्यंत गजबजलेल्या वाहतूकीच्या रस्त्यावर बांधावयाचा असल्यामुळे वाहतूक वळविणे व त्याचे नियमन करणे यामुळे बांधकामात अनेकवेळा बाधा येण्याची शक्यता असल्यामुळे सदर काम रात्रीच्या वेळेतही करावे लागणार आहे. त्यामुळे मजूर व यंत्रसामुग्री यावर जादा खर्च होईल. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या कामाचा अंदाजपत्रकीय खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसूची (DSR) नुसार तयार केला असून त्यामध्ये वरकड खर्च (Overhead charges) १०% धरला आहे. तथापि, मोठया कंत्राटदारांचा वरकड खर्च जास्त प्रमाणात असतो. तसेच नॅशनल हायवे ॲथॉरीटीच्या पध्दतीनुसार वरकड खर्च २५% ते ३५% एवढा असतो. या सर्व बाबींचा विचार करता जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स यांनी दिलेली खर्चातील अधिक्याची कारणे योग्य असून त्यांनी दिलेला देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर काम १८ महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

३.३ चर्चेदरम्यान सदस्यांनी अशी सूचना केली की, सेवावाहिन्यांचे स्थलांतर, वाहतूकीचे नियमन, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, बाजारभाव, वरकड खर्च इ. बाबी विचारात घेऊन प्रकल्पाचा वास्तववादी (Realistic) अंदाजित खर्च तसेच प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी तयार करावा.

३.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०६७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ येथील मिलन सबवे लगत भूयारी मार्गासहीत रस्ते सुधारणा आणि रेल्वे ओलांडणी पूल बांधणे या कामासाठी जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९४% जास्त दराची म्हणजे ४१.५० कोटी (रुपये एक्केचाळीस कोटी पन्नास लाख मात्र) किंमतीची निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व मुक्त मार्ग टप्पा-१ (प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ते आणिक पर्यंत) उन्नत रस्ता बांधणे - निविदांना मंजूरी देणेबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या प्राधान्यक्रम-१ मध्ये समाविष्ट असलेल्या पूर्व मुक्त मार्ग टप्पा-१ (प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ते आणिक पर्यंत) या प्रकल्पाची जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत केंद्र शासनाने निवड केली असून रु.३३६.३८ कोटी इतक्या प्रकल्प खर्चास मान्यता दिली आहे. या खर्चामध्ये केंद्र शासन, राज्य शासन व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

यांचा अनुक्रमे ३५%, १५% व ५०% हिस्सा आहे. या प्रकल्पासाठी पहिल्या हप्त्यापोटी रु.५.८८ कोटी इतका निधी केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिला आहे. तसेच या प्रकल्पाचे संरेखन व त्यासाठी लागणारी जागा उपलब्ध करुन देण्यास मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी मान्यता दिली आहे. तसेच पूर्व मुक्त मार्गाच्या आणिक ते पांजरपोळ रस्त्याच्या (पूर्व मुक्त मार्ग टप्पा-२ च्या) कामासाठी २५% अनुदान म्हणून रु.३५ कोटी इतका निधी या प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे. या प्रकल्पाच्या सखोल अभियांत्रिकी व प्रकल्प व्यवस्थापनासाठी मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांनी या प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार केले असून सन २००६-०७ च्या जिल्हा दरसूची व बाजारभावानुसार सदर प्रकल्पाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.३९३.०० कोटी इतका आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या रु.३३६.३८ कोटी इतक्या खर्चातील प्राधिकरणाच्या हिस्स्याच्या खर्चाव्यतिरिक्त रु.१९४.६२ कोटी इतका जादा खर्चसुध्दा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास स्वतःच्या निधीतून करावा लागेल. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे सदर कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन Lumpsum पध्दतीवर निविदा मागविण्यात आल्या. एकूण ११ कोरे निविदा संच विकले गेले. त्यापैकी विहित कालावधीमध्ये एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांची छाननी केली असता सर्व निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.११% जास्त दराची म्हणजे रु.५३१.०० कोटी किंमतीची निविदा लघुत्तम आहे. यासंबंधात मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या लघुत्तम निविदाकाराशी वाटाघाटी केल्या असता त्यांनी त्यांच्या निविदेतील दर कमी करण्यास असमर्थता व्यक्त केली. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, लघुत्तम निविदाकाराने वाढीव रकमेची दिलेली कारणे तपासून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने अशी शिफारस केली आहे की, कामाची अवघड व्याप्ती, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेत काम करण्याची परिस्थिती, बाजारभाव, कामाच्या व्याप्तीनुसार ३६ महिन्यांच्या विहित कालावधीपेक्षा प्रत्यक्ष कामाचा कालावधी वाढण्याची शक्यता इत्यादी बाबी विचारात घेता अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा २७.०८% इतका वाढीव दर योग्य वाटतो. लघुत्तम निविदा यापेक्षा ८% जास्त दराची असली तरीही, पूर्व मुक्त मार्गाचे संरेखन दाटीवाटीच्या जागेतून जात असून प्रत्यक्ष कामास विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागणार

..९/-

असल्यामुळे कंत्राटदारास अतिरिक्त स्त्रोतांची गरज लागेल व त्यामुळे खर्चात वाढ होईल तसेच या प्रकल्पासाठी लागणारी जागा व इतर सोयीसुविधा देण्यास मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी मान्यता दिलेली आहे या सर्व बाबींचा विचार करता मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

४.२ चर्चेदरम्यान, सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, सेवावाहिन्यांचे स्थलांतर, वाहतूकीचे नियमन, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, बाजारभाव, वरकड खर्च (Overhead charges) इ. बाबी विचारात घेऊन यापुढील मुख्यतः मोठया प्रकल्पांसाठी वास्तववादी अंदाजित खर्च तयार करण्यात यावा. यासाठी आवश्यक तेथे श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीचे मार्गदर्शन घेण्यासंबंधी विचार करावा.

४.३ श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता श्री.मूर्ती, प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे स्पष्ट केले की, रेल्वेच्या प्रस्तावित सहाव्या रेल कॉरिडॉरच्या प्रस्तावास प्राधान्य दिलेले नसल्यामुळे या रेल कॉरिडॉरमुळे पूर्व मुक्त मार्ग टप्पा-१ च्या बांधकामास कोणतीही बाधा येणार नाही.

४.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०६८</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाच्या (JNNURM) पूर्व मुक्त मार्ग टप्पा-१ (प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ते आणिक पर्यंत) उन्नत रस्ता बांधणे या

..१०/-

कामासाठी मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३५.११% जास्त दराची म्हणजे रु.५३१.०० कोटी (रुपये पाचशे एकतीस कोटी मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे रेल्वे स्थानक (पूर्व) ते कलानगरपर्यंत उन्नत पादचारी मार्ग (Pedestrian Skywalk) या कामाकरीता मागविलेल्या निविदेला मंजूरी देण्याबाबत.**

**५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात अंदाजे २० रेल्वे स्थानकांभोवती एकूण सुमारे रु.६०० कोटी इतक्या खर्चाच्या उन्नत पादचारी मार्गांची (Pedestrian Skywalk) उभारणी करण्यास तसेच रेल्वे परिसरातील वाहतूक व्यवस्था सुधारणा (SATIS) करण्यास दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीत प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रथमतः प्रायोगिक तत्वावर वांद्रे रेल्वे स्थानक (पूर्व) ते कलानगर पर्यंत उन्नत पादचारी मार्ग बांधण्याचे काम हाती घ्यावयाचे आहे. मे.एस.टी.बी.कन्सल्टंट या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने या उन्नत पादचारी मार्गाची सर्वसामान्य रचना, नकाशे व अंदाजपत्रक तयार केले आहे. या उन्नत पादचारी मार्गाची लांबी १३०० मी. व रुंदी ४ मी. असून या कामाचा अंदाजित खर्च रु.९.९५ कोटी इतका आहे. सन २००६-०७ ची जिल्हा दरसूची व पश्चिम द्रुतगती महामार्गाचे मंजूर दर यानुसार या प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार केले असून त्यानुसार या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु.१०.४५ कोटी इतका आहे. या कामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ९ कोरे निविदा संच विकले गेले. त्यापैकी विहित कालावधीमध्ये ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदांची

छाननी केली असता सर्व निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.दास ऑफ शोअर इंजिनिअरींग प्रा. लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.००% जास्त दराची निविदा लघुत्तम आहे. या लघुत्तम निविदाकारासमवेत वाटाघाटी केल्या असता त्यांनी त्यांचा दर कमी करण्यास नकार दिला. सदर लघुत्तम देकार स्विकारण्याची शिफारस करताना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारानी निविदेतील वाढीव दराविषयी नमूद केले आहे की, लघुत्तम निविदाकाराने गृहित धरलेला सुमारे ४% व्हॅट व जकात कर हा अंदाजपत्रकीय खर्चात समाविष्ट केलेला नाही, सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन २००६-०७ च्या जिल्हा दरसूचीवर आधारित असून त्यानंतर जून, २००७ मध्ये तयार केलेल्या दरपत्रकानुसार दरांमध्ये सुमारे ८% वाढ झालेली आहे, सदर कामासाठी लागणा-या स्ट्रक्चरल स्टीलच्या बाजारभावामध्ये सुमारे १५% वाढ झालेली आहे, या कामासाठी वापरावयाच्या पॉलीकार्बोनेट शीटचा भाव गेल्या ६ महिन्यांपासून सारखा वाढत आहे तसेच स्ट्रक्चरल स्टील गंजण्यास प्रतिबंध करण्यासाठी करावयाच्या इपॉक्सी उपाययोजनेचे दर जिल्हा दरसूचीत उपलब्ध नसल्याने निविदाकाराने बाजारभावाने खर्च गृहित धरलेला असून त्यामुळे निविदेतील रकमेत वाढ झालेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता मे.दास ऑफ शोअर इंजिनिअरींग प्रा.लि. यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

५.२ श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता श्री.मूर्ती, प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे स्पष्ट केले की, फेरीवाल्यांचा उपद्रव होऊ नये म्हणून या उन्नत पादचारी मार्गाच्या देखभाल (Maintenance) आणि सुरक्षिततेसाठी (Security) खाजगी एजन्सीची नेमूणक करावयाची असून त्यासाठी होणा-या खर्चापोटी सदर उन्नत पादचारी मार्गावरील जाहिरातींचे हक्क सदर एजन्सीकडे देण्यात येतील. तसेच वांद्रे स्थानकातील पादचारी वरपूल आणि सदर उन्नत पादचारी मार्गाची उंची सारखीच असल्यामुळे उन्नत पादचारी मार्गावर येण्यासाठी एस्कलेटर्सची गरज लागणार नाही. यासंबंधात महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, प्रायोगिक तत्वावर उन्नत हॉकर प्लाझा बांधण्याची योजना प्राधिकरणाच्या विचाराधिन आहे.

..१२/-

५.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०६९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे रेल्वे स्थानक (पूर्व) ते कलानगरपर्यंत उन्नत पादचारी मार्ग बांधण्यासाठी मे.दास ऑफ शोअर इंजिनिअरींग प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३७.००% जास्त दराची म्हणजे रु.१३,६३,१५,०००/- (रुपये तेरा कोटी त्रेसष्ट लाख पंधरा हजार मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्याची कामे - ना.सी.फडके मार्गाचे रुंदीकरण व बांधकाम - प्रचलित दर व वाढीव मुदत देणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ना.सी.फडके मार्गाचे रुंदीकरण व बांधकाम हाती घेतले असून त्यामध्ये पश्चिम द्रुतगती महामार्ग ते गोखले पूल, टिपू सुलतान चौक ते संत नामदेव चौक, साईवाडी चौकातील पूल तसेच तेली गल्ली ते सहार रस्ता या भागातील कामांचा समावेश आहे. या कामासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर या कंत्राटदाराची नेमणूक केली

असून त्यांच्या निविदेनुसार मूळ कंत्राटातील कामाची किंमत रु.२३.५० कोटी इतकी आहे. या कामासाठीचा १५ महिन्याचा कालावधी दिनांक २ सप्टेंबर, २००६ रोजी संपला. तथापि, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, वृक्ष छाटणीसाठी आवश्यक असलेली परवानगी, सेवा सुविधांचे स्थलांतर इत्यादी कारणांमुळे ना.सी.फडके मार्ग व गुलमोहोर रस्ता यांचे काम पूर्ण होऊ शकले नाही. तसेच अतिक्रमण निष्कासन न झाल्यामुळे जुहू गल्ली व सहार रस्ता मिसिंग लिंक यांचे कामही अपूर्ण राहीले. कामाचा मूळ कालावधी संपल्यामुळे कामाचा करारनामा रद्द करुन मुक्त करण्याची विनंती सदर कंत्राटदाराने केली. तथापि, जुहू गल्ली व सहार रस्ता मिसिंग लिंक येथील जागा मोकळी होईल या अपेक्षेने सदर कंत्राटदारांना दिनांक ३१ मे, २००७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दरम्यान जी कामे पूर्ण करणे शक्य होते ती कामे अपूर्ण ठेवल्याबद्दल कंत्राटदारावर नुकसान भरपाईची कार्यवाही करण्यात आलेली आहे. आतापर्यंत मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर यांनी गुलमोहोर रस्ता व ना.सी.फडके मार्ग यांचे रुंदीकरणाचे काम पूर्ण केले आहे. तसेच गोखले पूलावरील मास्टीक अस्फाल्टचे अतिरिक्त काम आणि गुलमोहोर रस्त्यावरील सोनी वर्ल्ड ते रिलायन्स वेब वर्ल्ड या भागातील अतिरिक्त कामेही पूर्ण केलेली आहेत. मात्र जुहू गल्ली व सहार रस्ता मिसिंग लिंकचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी वाढीव दर देण्यासंबंधीचा प्रस्ताव तपासण्यासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने एक समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीची पहिली बैठक दिनांक ९ ऑक्टोबर, २००७ रोजी झाली. त्यानुसार समितीने असे सूचविले आहे की, केवळ सिमेंट, स्टील, बिटयुमिन इत्यादी मूलभूत बाबींसाठी सध्याचे बाजारभाव विचारात घ्यावेत, त्यानुसार वाढीव दर प्रस्तावित करावेत तसेच पुढील कालावधीसाठी या मूलभूत बाबींना बाजारभावातील वाढीनुसार फरक अदा करावा व उर्वरीत कामासाठी निविदेतील तरतूदीप्रमाणे भाववाढ देण्यात यावी. सदर समितीचा हा निर्णय मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर यांना कळविण्यात आला असता त्यांनी समितीच्या सूचनेप्रमाणे काम करण्यास असमर्थता दर्शविली असून उर्वरीत काम सन २००७-०८ च्या प्रचलित दरसूचीनुसार करण्यास तयारी दर्शविली आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मिसिंग लिंकपैकी जुहू गल्लीमधील अतिक्रमण निष्कासनाचे ७५% काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम लवकरच पूर्ण होईल. तसेच सहार रस्ता मिसिंग लिंकमधील अतिक्रमण निष्कासनाचे कामही लवकरच पूर्ण होईल

अशी अपेक्षा आहे. अतिक्रमण निष्कासन झालेल्या भागात रस्त्याचे काम तातडीने सुरु करणे आवश्यक आहे अन्यथा त्या जागेवर पुन्हा अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, नव्याने निविदा मागवून उर्वरीत काम हाती घेण्यासाठी किमान ४ महिन्यांचा कालावधी लागेल व त्या कालावधीत होणारी अतिरिक्त भाववाढ नवीन कंत्राटदारास द्यावी लागेल. तसेच अशाप्रकारच्या कामांसाठी सध्याचे देकार हे प्रचलित दरसूचीनुसार काढलेल्या निविदांवर किमान ८ ते १०% जास्त दराचे प्राप्त होतात. त्याचप्रमाणे विद्यमान कंत्राटदारास नवीन दरसूचीप्रमाणे काम करण्याचे आदेश दिल्यास सदर काम त्वरीत सुरु होऊन लवकर पूर्ण होऊ शकते. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, कंत्राटदाराने केलेली अतिरिक्त कामे विचारात घेता सर्व कामांची अंतीम किंमत रु.२७.९९ कोटी इतकी होते. या सुधारीत खर्चास मान्यता देण्याचा तसेच उर्वरीत कामाकरीता मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर या विद्यमान कंत्राटदारास यापुढे देय होणा-या भाववाढीसाठी मूळ निर्देशांक हा जुलै ते सप्टेंबर, २००७ च्या सरासरी निर्देशांकाप्रमाणे ठरविण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

६.२ श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, बाब टिप्पणीबरोबर संबंधित कामाचा नकाशाही जोडण्यात यावा. या सूचनेस अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मान्यता दिली.

६.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०७०</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी ना.सी.फडके मार्गाच्या दिनांक १ जून, २००७ रोजी उर्वरीत कामासाठी सन २००७-०८ ची मंजूर

दरसूची लागू करण्यास मान्यता देत असून, त्यामुळे या कामासाठी पूर्वी मान्यता दिलेल्या रु.२३.५० कोटीपेक्षा येणा-या जास्त खर्चास म्हणजे एकूण रु.२७.९९ कोटी खर्च करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे. कामाची निकड लक्षात घेता तसेच मूळ करारनाम्यातील दरात उपरोक्त बदल करुन करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. तसेच उर्वरीत कामांकरीता देय होणा-या भाववाढीचे परिगणन करण्यासाठी मूळ (Basic) निर्देशांक हा जुलै ते सप्टेंबर, २००७ या तिमाहीच्या सरासरी निर्देशांकाप्रमाणे ठरविण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या निवासी गाळयांच्या प्रकल्पांसाठी रस्ते बांधणे (मुंबई-१) या बाहय पायाभूत सुविधा कामाच्या वाढीव खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

**७.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे बाधित होणा-या लोकांच्या पुनर्वसनासाठी एकूण १५ ठिकाणी पक्क्या सदनिकांची बांधकामे करण्यात आली. या निवासी इमारतींकरीता रस्ते, पाणीपुरवठा, मलनिःसारण इत्यादी बाहय पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विनंतीनुसार व कार्यकारी समितीच्या मान्यतेने पार पाडण्यात आली. जागतिक बँकेच्या रेटयामुळे बाहय पायाभूत सुविधांची कामे तातडीने सुरु करणे आवश्यक असल्यामुळे, एखाद्या कंत्राटदाराकडून काही कारणांमुळे काम पूर्ण होऊ शकले नाही तर सदर कंत्राटातील उर्वरीत काम दुस-या कंत्राटदाराकडून करुन घेणे शक्य व्हावे या दृष्टीकोनातून प्रत्येक कामाकरीता निविदा मागवून कार्यकारी समितीच्या मान्यतेने दोन वेगवेगळे कंत्राटदार

नेमण्यात आले. आणिक येथील कायमस्वरुपी सदनिकांसाठी रस्ते बांधणे (मुंबई-१) या कामासाठी मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.१९% कमी दराच्या निविदेस तसेच मानखुर्द येथील कायमस्वरुपी सदनिकांसाठी रस्ते बांधणे (मुंबई-२) या कामासाठी मे.गुरुदत्त कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७७% कमी दराच्या निविदेस कार्यकारी समितीची मान्यता घेण्यात आली. सदर बाहय पायाभूत सुविधांचा खर्च उपविकासकाकडून झोपडपट्टी पुनर्विकास नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या निधीतून करावयाचा आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, पहिल्या दोन महिन्यात मे.गुरुदत्त कन्स्ट्रक्शन यांच्या कामाची प्रगती समाधानकारक नसल्यामुळे त्यांच्या कामाचा व्याप कमी करुन काही कामे मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी यांना देण्यात आली. मानखुर्द येथील रस्त्याची रुंदी १३ मी. वरुन १८ मी. करण्यात आली तसेच प्रकल्पाच्या बाहेरील रस्त्यांचे डांबरीकरण व गटारांचे बांधकाम यामुळे मानखुर्द येथील कामाचा व्याप वाढला. तसेच ओशिवरा येथील कायमस्वरुपी सदनिकांसाठी रस्ते व गटारे बांधण्याचे मूळ कामामध्ये समावेश नसलेले अतिरिक्त काम मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी यांना देण्यात आले. अशारितीने मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी यांची मंजूर निविदा रक्कम रु.२.६९ कोटी असली तरीही आतापर्यंत त्यांनी एकूण रु.५.७७ कोटीचे काम केले आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या निविदेतील देकारांचा दर मे.गुरुदत्त कन्स्ट्रक्शन यांच्या देकाराच्या दरापेक्षा २.४२% कमी असल्याने या कामांमध्ये प्राधिकरणाची सुमारे रु.६.९८ लाख इतकी बचत झाली आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले आहे की, कायमस्वरुपी सदनिकांसाठी रस्ते व गटारांचे बांधकाम पूर्ण केल्याशिवाय इमारतींना ना-भोगवटा प्रमाणपत्र मिळणे शक्य नव्हते व त्यामुळे प्रकल्पबाधित लोकांना कायमस्वरुपी सदनिकांमध्ये हलविणे शक्य झाले नसते. त्यामुळे वरील वाढीव कामे मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून करुन घेण्यात आली असून त्यासाठी झालेल्या रु.३.०९ कोटी इतक्या अतिरिक्त खर्चास कार्योत्तर मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**७.२** चर्चेदरम्यान, श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, प्रकल्पाच्या वाढीव खर्चास मान्यता घेण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करताना यापुढे संबंधित बाब टिप्पणीत पुढील मुद्यांसबंधी प्रपत्र स्वरुपात माहिती देण्यात यावी – (१) प्रकल्पाच्या व्याप्तीत झालेली वाढ, (२) कामाच्या निविदेतील दर व वास्तववादी दर, (३) जिल्हा दरसूची (DSR) या कामासाठी संयुक्तिक नसल्यास किती वाढीव दर देण्यात यावा, आणि (४) या कामासाठी वरकड खर्च (Overhead charges) किती असावा

या सूचनेस अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मान्यता दिली.

**७.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०७१</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या निवासी गाळयांकरीता बाहय पायाभूत सुविधा पुरविणेसाठी रस्ते बांधणी (मुंबई-१) या कामासाठी मंजूर निविदा रकमेपेक्षा जास्त झालेल्या रु.३.०९ कोटी इतक्या वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता देत आहे."

**बाब क्र.८ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ ऑगस्ट, २००७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००७.**

दिनांक १ ऑगस्ट, २००७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००७ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.९ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुलूंड चेकनाका ते सायन या पूर्व द्रुतगती महामार्गाच्या भागाचे रुंदीकरण व सुधारणा करण्याच्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गाच्या मुलूंड चेकनाका ते सायन या १८.३५ कि.मी. लांबीच्या भागाचे रुंदीकरण व सुधारणा करण्याच्या कामाच्या रु.१२४.४८ कोटी इतक्या किंमतीच्या निविदांना कार्यकारी समितीने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सदर काम ५ पॅकेजेसमध्ये विभागून सन २००४ मध्ये हाती घेण्यात आले. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी १२ ते १५ महिने असा होता. तथापि, रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे, सध्याच्या सर्व्हिस लाईन्स् हलविणे यामध्ये विलंब झाल्यामुळे तसेच काही भागात बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेल्या सर्व्हिस लाईन्सच्या कामात झालेला विलंब त्याचप्रमाणे काही कामांत करावा लागलेला तांत्रिक बदल इत्यादी कारणांमुळे काम विहित कालावधीत पूर्ण होऊ शकले नाही. पूर्व द्रुतगती महामार्गाच्या पश्चिम बाजूकडून सर्व्हिस रोडमधून मलनिःसारण वाहिनीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतले असून सदर काम फेब्रुवारी, २००८ पर्यंत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे. त्यामुळे मूळ निविदेतील सर्व्हिस रोडचे काम हाती घेणे आता शक्य होईल. तथापि, या कामांचा मूळ अंदाजपत्रकीय खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००१-०२ च्या जिल्हा दरसूचीवर आधारीत असल्याने संबंधित कंत्राटदाराने यापूर्वीच्या दरानुसार काम करण्यास नकार दिलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसूचीनुसार प्रकल्पातील मूळ कामे तसेच अतिरिक्त कामे यांचा सुधारीत अंदाजित खर्च रु.१८८.९७ कोटी इतका झाला आहे. त्यापैकी अतिरिक्त कामांचा खर्च सुमारे रु.१६ कोटी इतका असून सुधारीत दरसूचीनुसार मूळ कामांच्या खर्चात सुमारे रु.६१ कोटीची वाढ झालेली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने रस्त्याच्या पश्चिमेकडील सर्व्हिस रोडच्या ठिकाणी ३००० मि.मी. व्यासाची मलनिःसारण वाहिनी रस्त्याच्या पृष्ठभागापासून ८ मी. खोलीवर टाकली असून त्यावर रस्त्यास उपयुक्त नसलेल्या साहित्याने भराव केलेला आहे. म्हणून सदरील साहित्य काढून बाहेर वाहतूक करुन टाकणे व रस्त्याच्या पृष्ठभागाच्या संकल्पनेनुसार काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे अंदाजपत्रकात वाढ झाली आहे.

..१९/-

पाईप लाईन टाकताना ब-याच ठिकाणी मुख्य रस्त्याची गटारेही कोसळलेली आहेत व मोठमोठ्या मशिनरीच्या रहदारीमुळे मुख्य कॅरेजवेची एक लेन खराब झालेली आहे. त्यामुळे गटारांची पुनर्बांधणी व रस्त्याची दुरुस्ती करणे अनिवार्य आहे. काही भागातील अतिक्रमणे हटवणे व सर्व्हिस लाईन टाकणे यामुळे आर.ओ.डब्ल्यु गटारांचे काम पूर्ण करणे शक्य झाले नव्हते. आता सर्व अडचणी दूर झाल्यामुळे उर्वरीत कामाच्या अंदाजपत्रकात त्याचा समावेश केला आहे. तसेच बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे काही कामे मूळ अंदाजपत्रकात समाविष्ट नव्हती. त्याचप्रमाणे काही कामात तांत्रिक बदल करणे आवश्यक झाले. त्यानुसार पूर्व द्रुतगती महामार्गाच्या मुलुंड चेकनाका ते सायन या भागाचे रुंदीकरण व सुधारणा करण्याच्या कामाच्या रु.१८८.९७ कोटी इतक्या सुधारीत अंदाजित खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर काम पॅकेज-११ ते १५ अशा ५ पॅकेजेसमध्ये हाती घेण्यात आले असून त्यापैकी पॅकेज-११ मधील काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत पॅकेजेसमधील कामे पुरोबंध (foreclose) न करता सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार पूर्ण करण्यास मूळ कंत्राटदार तयार झाल्यास त्यांचेकडून प्रस्ताव घेऊन त्यांना सदर कामे देण्यास महानगर आयुक्त यांना कार्यकारी समितीने प्राधिकृत करावे. मूळ कंत्राटदाराच्या निविदा जर कमी दराच्या असतील तर सुधारीत दरसूचीवर तेवढयाच कमी दराने काम करण्याचा प्रस्ताव मूळ कंत्राटदाराकडून प्राप्त झाल्यास त्यानुसार त्यांना कामे देण्यात येतील. तथापि, या सुधारीत दराने काम पूर्ण करण्यास कंत्राटदारांनी नकार दिल्यास उर्वरीत कामांसाठी नव्याने निविदा मागविण्यात येतील.

९.३ चर्चेनंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, पूर्व द्रुतगती महामार्गाच्या मुलुंड चेकनाका ते सायन या भागाचे रुंदीकरण व सुधारणा करण्याच्या कामाच्या रु.१८८.९७ कोटी इतक्या सुधारीत अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. त्यानुसार महानगर आयुक्त यांनी मूळ कंत्राटदारांसमवेत चर्चा करुन त्यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करावेत व त्यानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन सदर प्रस्ताव कार्यकारी समितीपुढे सादर करावेत.

..२०/-

९.४ त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०७२ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गाच्या मुलूंड चेकनाका ते सायन या भागाचे रुंदीकरण व सुधारणा करणेच्या कामाच्या रु.१८८.९७ कोटी इतक्या सुधारीत अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर पॅकेज-१ मधील प्रस्तावित उड्डाणपूलांच्या कामांकरीता मागविलेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील पुढील उड्डाणपूलांना दिनांक २५ जुलै, २००६ रोजी झालेल्या २१७ व्या बैठकीत कार्यकारी समितीने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे — (१) सायन हॉस्पिटल - रु.२०.७० कोटी, (२) हिंदमाता सिनेमा चौक - रु.१४.८९ कोटी, (३) भारतमाता सिनेमा चौक - रु.१५.८३ कोटी, (४) दत्ताराम लाड पथ व लालबाग चौक - रु.४०.४९ कोटी आणि (५) किंग्ज सर्कल आणि तुळपुळे चौक - रु.४६.२६ कोटी. या उड्डाणपूलांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.एस.एन.भोबे अँड असोसिएट्स यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी सर्वेक्षण करुन तयार केलेल्या प्रस्तावास श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीने मान्यता दिलेली आहे. या उड्डाणपूलांपैकी पॅकेज-१ अंतर्गत सायन हॉस्पिटल, किंग्ज सर्कल, तुळपुळे चौक व हिंदमाता सिनेमा चौक येथील उड्डाणपूलांच्या पूर्व मुक्त मार्गासाठी वापरण्यात आलेल्या दरसूचीनुसार एकत्रित अंदाजपत्रकीय खर्च रु.८३.०० कोटी इतका आहे. या उड्डाणपूलांच्या बांधकामाकरीता सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा

मागविण्यात आल्या. एकूण ७ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ३ निविदा प्राप्त झाल्या. त्या निविदांची छाननी केली असता सर्व निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.एन.सी.सी.- जे.कुमार (जे.व्ही.) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९३% जास्त दराची म्हणजे रु.१११.९० कोटी किंमतीची निविदा लघुत्तम आहे. निविदेची टक्केवारी काढताना उड्डाणपूलांचा अंदाजपत्रकीय खर्च तसेच निविदेमध्ये अंतर्भूत नसलेला वळण रस्त्याच्या दुरुस्तीपोटी येणारा रु.७.२९ कोटी इतका खर्च या दोन्हींचा एकत्रित विचार करण्यात आला आहे. सदर लघुत्तम निविदाकारासमवेत वाटाघाटी केल्या असता त्यांनी निविदेतील दर कमी करण्यास असमर्थता व्यक्त केली. लघुत्तम निविदेतील वाढीव दरासंबंधी महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, अंदाजपत्रकात गृहित धरल्यापेक्षा वाढीव विक्रीकर, स्टील्टकरीता FBEC चे कोटींग वापी येथे करावयाचे असल्यामुळे वाहतूकीच्या खर्चातील वाढ तसेच जकात दोन वेळा भरावी लागणे, वाढीव वरकड खर्च, जिल्हा दरसूचीतील सुधारीत दर इत्यादींमुळे प्राप्त झालेली लघुत्तम निविदा वाढीव दराची आहे. या सर्व बाबींचा विचार करता मे.एन.सी.सी. - जे.कुमार (जे.व्ही.) यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१०.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०७३</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर पॅकेज-१ अंतर्गत (१) सायन हॉस्पिटल, (२) किंग्ज सर्कल, (३) तुळपुळे चौक व (४) हिंदमाता सिनेमा चौक या चार उड्डाणपूलांच्या बांधकामासाठी मे.एन.सी.सी. - जे.कुमार

(जे.व्ही.) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९३% जास्त दराची म्हणजे रु.१११.९० कोटी (रु.एकशे अकरा कोटी नव्वद लाख मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर पॅकेज-२ मधील प्रस्तावित उड्डाणपूलांच्या कामांकरीता मागविलेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

**११.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील पुढील उड्डाणपूलांना दिनांक २५ जुलै, २००६ रोजी झालेल्या २१७ व्या बैठकीत कार्यकारी समितीने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे – (१) सायन हॉस्पिटल - रु.२०.७० कोटी, (२) हिंदमाता सिनेमा चौक - रु.१४.८९ कोटी, (३) भारतमाता सिनेमा चौक - रु.१५.८३ कोटी, (४) दत्ताराम लाड पथ व लालबाग चौक - रु.४०.४९ कोटी आणि (५) किंग्ज सर्कल आणि तुळपुळे चौक - रु.४६.२६ कोटी. या उड्डाणपूलांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.एस.एन.भोबे अँड असोसिएट्स यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी सर्वेक्षण करुन तयार केलेल्या प्रस्तावास श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीने मान्यता दिलेली आहे. या उड्डाणपूलांपैकी पॅकेज-२ अंतर्गत भारतमाता सिनेमा-लालबाग जंक्शन येथील उड्डाणपूलाचे बांधकाम हाती घ्यावयाचे असून पूर्व मुक्त मार्गासाठी वापरण्यात आलेल्या दरसूचीनुसार या उड्डाणपूलाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.१२०.०० कोटी इतका आहे. या उड्डाणपूलाच्या बांधकामाकरीता सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या. एकूण ९ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित

कालावधीमध्ये ५ निविदा प्राप्त झाल्या. या निविदाकारांचे वित्तीय देकार उघडल्यानंतर असे दिसून आले की, जे.एम.सी.-ए.टी.इ.पी.एल.(जे.व्ही.) यांना प्रिकास्ट सेगमेंटल कन्स्ट्रक्शनच्या कार्य अनुभवाचे प्रमाणपत्र उप कंत्राटदार म्हणून मिळालेले आहे. वास्तविकतः निविदेतील अटींप्रमाणे ते मूळ कंत्राटदार म्हणून असणे आवश्यक आहे. त्यामुळे जे.एम.सी.-ए.टी.इ.पी.एल.(जे.व्ही.) यांची निविदा अवैध्य ठरविण्यात आली. उर्वरीत निविदांपैकी मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.३७% जास्त दराची म्हणजे रु.१४९.४० कोटी किंमतीची निविदा लघुत्तम आहे. निविदेची टक्केवारी काढताना उड्डाणपूलाचा अंदाजपत्रकीय खर्च तसेच निविदेमध्ये अंतर्भूत नसलेला वळण रस्त्याच्या दुरुस्तीपोटी येणारा रु.७.२९ कोटी इतका खर्च या दोन्हींचा एकत्रित विचार करण्यात आला आहे. सदर लघुत्तम निविदाकारासमवेत वाटाघाटी केल्या असता त्यांनी निविदेतील दर कमी करण्यास असमर्थता व्यक्त केली. लघुत्तम निविदेतील वाढीव दरासंबंधी महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, अंदाजपत्रकात गृहित धरल्यापेक्षा वाढीव विक्रीकर, स्टील्टकरीता FBEC चे कोटींग वापी येथे करावयाचे असल्यामुळे वाहतूकीच्या खर्चातील वाढ तसेच जकात दोन वेळा भरावी लागणे, वाढीव वरकड खर्च, जिल्हा दरसूचीतील सुधारीत दर इत्यादींमुळे प्राप्त झालेली लघुत्तम निविदा वाढीव दराची आहे. या सर्व बाबींचा विचार करता मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

११.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>**ठराव क्र.१०७४ :**</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,

..२४/-

कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर पॅकेज-२ अंतर्गत भारतमाता सिनेमा - लालबाग जंक्शन येथील उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.३७% जास्त दराची म्हणजे रु.१४९.४० कोटी (रुपये एकशे एकोणपन्नास कोटी चाळीस लाख मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सहार उन्नत मार्गाचे (पश्चिम द्रुतगती महामार्ग, अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता व असल्फा गाव येथून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी उन्नत रस्त्याचे) संकल्पन व बांधकाम करणे.**

**१२.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या प्राधान्यक्रम-१ मध्ये समाविष्ट असलेल्या सहार उन्नत मार्ग या प्रकल्पाची जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत केंद्र शासनाने निवड केली असून रु.१५५.१३३४ कोटी इतक्या प्रकल्प खर्चास मान्यता दिली आहे. या खर्चामध्ये केंद्र शासन, राज्य शासन व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा अनुक्रमे ३५%, १५% व ५०% हिस्सा आहे. या प्रकल्पासाठी पहिल्या हप्त्यापोटी रु.५.४३ कोटी इतका निधी केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिला आहे. या प्रकल्पाच्या सखोल अभियांत्रिकी व प्रकल्प व्यवस्थापनासाठी मे.स्टूप कन्सल्टंट्स प्रा.लि. यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांनी या प्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार केले असून सन २००६-०७ च्या जिल्हा दरसूची व बाजारभावानुसार सदर प्रकल्पाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.२१२.५० कोटी इतका आहे. श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक

बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सदर कामात मार्गदर्शन केले आहे. त्यानुसार बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सदर कामासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन Lumpsum पध्दतीवर म्हणजे कंत्राटदाराच्या संकल्पनेवर आधारीत निविदा मागविण्यात आल्या. एकूण ७ कोरे निविदा संच विकले गेले. निविदाकारांसमवेत झालेल्या निविदापूर्व बैठकीमधील चर्चेच्या अनुषंगाने सदर कामात पुढील अतिरिक्त बाबींचा समावेश करण्यात आला – (१) सहार येथील फोर कोर्ट एरियामध्ये सुमारे ७०० मी. इतकी जादा लांबी, (२) एअरपोर्ट ॲथॉरिटी कॉलनीजवळ वाहतूकीच्या सोयीसाठी ३ अतिरिक्त रॅम्प्स, (३) ६ मार्गिकांच्या उन्नत रस्त्याची रुंदी २३ मी. वरुन २७.६ मी. इतकी वाढविणे, (४) रस्त्याच्या सुरुवातीस व्हेहीक्युलर सबवे व टनेलमध्ये सुमारे १ मी. रुंदी फुटपाथच्या सोयीसाठी वाढविणे तसेच टनेलच्या छताची लांबी पोचमार्गामध्ये वाढविणे, (५) वास्तुशास्त्रज्ञाच्या मदतीने प्रकल्पाच्या सौंदर्यीकरणास लागणारी तरतूद. या अतिरिक्त बाबींमुळे या कामाचा अंदाजित खर्च रु.२९७.७० कोटी इतका झाला आहे. विहित कालावधीमध्ये एकूण २ निविदा प्राप्त झाल्या. या निविदांची छाननी केली असता दोन्ही निविदाकार पात्र ठरले. त्यापैकी मे.लार्सन अँड टुब्रो लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०९.८८% जास्त दराची निविदा लघुत्तम आहे. त्यासंबंधात मे.लार्सन अँड टुब्रो लि. यांच्यासमवेत वाटाघाटी केल्या असता त्यांनी सादर केलेला सुधारीत देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०५.८८% जास्त दराचा असून सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा सदर सुधारीत देकार ४६.९६% जास्त दराचा म्हणजे रु.४३७.५० कोटी इतका आहे. मे.लार्सन अँड टुब्रो लि. यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे सदर काम गुंतागुंतीचे असून सदर उन्नत मार्गाची रुंदी काही भागात ६ पदरी, काही भागात ४ पदरी, काही भागात ३ पदरी व काही भागात २ पदरी असल्यामुळे कामावर अतिरिक्त स्त्रोताची आवश्यकता आहे. तसेच सदर उन्नत रस्ता अत्यंत दाटीवाटीच्या जागेतून जाणार असल्यामुळे त्या भागातील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करावे लागेल. त्यामुळे सदर काम ३० महिन्यांच्या विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारांना अतिरिक्त स्त्रोताची गरज लागेल. या सर्व बाबींचा विचार करता मे.लार्सन अँड टुब्रो लि. यांचा लघुत्तम देकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा, सुसंवादी व रास्त असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१२.२** महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सहार उन्नत रस्ता मुख्यत्वे सहार विमानतळाकडे जाणा-या वाहतूकीसाठी उपयुक्त असल्यामुळे केंद्र शासनाने मंजूर केलेल्या रु.१५५.१३३४ कोटी इतक्या खर्चाव्यतिरिक्त, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, भूसंपादन इत्यादींवरील खर्च वगळून उर्वरीत सर्व खर्च मे.मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लि. (एम.आय.ए.एल.) यांनी त्यांच्या निधीतून करण्याचे मान्य केले आहे. याबाबत मे.एम.आय.ए.एल. यांचेबरोबर करार करण्यात येईल व त्यासाठी प्राधिकरणाची मंजूरी घेण्यात येईल.

**१२.३** चर्चेनंतर कार्यकारी समितीने असे ठरविले की, प्रस्तावित कामाची व्याप्ती पश्चिम द्रुतगती महामार्ग ते फोर कोर्ट (सहार विमानतळ) पर्यंतच सिमित करावी.

**१२.४** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०७५</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत (JNNURM) सहार उन्नत मार्गाचे (पश्चिम द्रुतगती महामार्ग, अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता व असल्फा गाव येथून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी उन्नत रस्त्याचे) संकल्पन व बांधकाम करणे या कामासाठी मे.लार्सन अँड टुब्रो लि. यांची सुधारीत अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४६.९६% जास्त दराची म्हणजे रु.४३७.५० कोटी (रु.चारशे सदतीस कोटी पन्नास लाख मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. परंतु सदर कामाची

..२७/-

व्याप्ती पश्चिम द्रुतगती महामार्ग ते सहार विमानतळ (फोर कोर्ट) पर्यंतच सिमित करावी व त्यादृष्टीने आवश्यक ती पुढील कार्यवाही महानगर आयुक्त यांनी करावी. या प्रकल्पासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत उपलब्ध होणाऱ्या रु.१५५.१३३४ कोटी इतक्या निधीव्यतिरिक्त होणारा वाढीव खर्च (प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, भूसंपादन इत्यादीवरील खर्च वगळून) मे.मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. (एम.आय.ए.एल.) यांचेकडून प्राप्त करुन घेण्यासाठी प्राधिकरणाची मान्यता घेण्यात यावी. तसेच यासंबंधात प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, भूसंपादन इत्यादीवरील खर्च प्राधिकरणाच्या निधीतून करण्यासाठीही प्राधिकरणाची मान्यता घेण्यात यावी.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग-२ च्या कामामध्ये रेल्वेवरपूल ते लोकमान्य टिळक टर्मिनलकडे जाणाऱ्या पुलाचा समावेश करुन त्या कामासाठी लागणाऱ्या रु.१४.३१ कोटी इतक्या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

१३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना सह महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे काम दोन भागांमध्ये हाती घेण्यात आले असून दोन्ही भागातील काम प्रगतीपथावर आहे. या रस्त्याच्या भाग-२ चे काम मे.गॅमन इंडिया लि. यांचेमार्फत मे, २००४ पासून हाती घेतले असून त्यांच्या मूळ कंत्राटाची किंमत रु.७९,९०,६०,५४२/- इतकी आहे. या रस्त्याच्या भाग-२ मधील कामाचा सुमारे ६०% हिस्सा रेल्वेच्या हद्दीत असून रेल्वे हद्दीतील काम रेल्वेच्या नियमानुसार व परवानगीने करावे लागते. त्यानुसार रेल्वे हद्दीतील कामाच्या ३०% इतकी रक्कम परिक्षणाचा खर्च म्हणून या प्राधिकरणाने मध्य रेल्वेकडे जमा केली आहे. मध्य रेल्वे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यानुसार रेल्वेवरपूल ते लोकमान्य टिळक टर्मिनलला

जोडणा-या पूलाचा समावेश भाग-२ च्या कामामध्ये करावयाचा आहे. सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.लुईस बर्जर ग्रुप आयएनसी यांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार रेल्वेवरपूल ते लोकमान्य टिळक टर्मिनल या पूलाचा अंदाजित खर्च रु.१४.३२ कोटी इतका आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सदर अंदाजपत्रकाची छाननी करुन रु.१४.३२ कोटी इतक्या अतिरिक्त खर्चाची शिफारस केली आहे. यानुसार मे.गॅमन इंडिया लि. यांना रेल्वेवरपूल ते लोकमान्य टिळक टर्मिनल या पूलाचे बांधकाम करण्यासाठी लागणा-या रु.१४,३१,७५,३८६/- इतक्या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१३.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०७६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.गॅमन इंडिया लि. यांना रेल्वेवरपूल ते लोकमान्य टिळक टर्मिनल या पूलाचे बांधकाम करण्यासाठी लागणा-या रु.१४,३१,७५,३८६/- इतक्या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे व त्या अनुषंगाने अस्तित्वातील करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-२, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग - १ व २ च्या कामासाठी नेमलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देणे व त्यांच्या अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.**

१४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना सह महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता तसेच सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या भाग-१ व ३ च्या कामाची सध्या ९५% भौतिक प्रगती झालेली आहे. जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-२ चे म्हणजे साकी विहार रस्ता ते लालबहादूर शास्त्री मार्ग या भागाचे काम फेब्रुवारी, २००५ पासून मे.युनिटी इन्फ्रा प्रोजेक्ट लि. यांचेमार्फत सुरु आहे. आय.आय.टी., मुंबई यांच्या सुमारे १ हेक्टर जमिनीचे हस्तांतरण करण्यास झालेला विलंब, ट्री ॲथॉरिटीकडून झाडे तोडण्याची परवानगी मिळण्यास झालेला विलंब, मार्बलच्या दुकानांचे पुनर्वसन करण्यास झालेला विलंब तसेच या भागात नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम इत्यादीमुळे मे, २००७ अखेरपर्यंत भाग-२ चे फक्त ३५% काम पूर्ण होऊ शकले. सह महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या भाग-१ म्हणजे मिठी नदी ते मध्य रेल्वे व राहूल नगर ते अमर महल नाका या भागाचे काम सप्टेंबर, २००३ पासून मे.पटेल इंजिनिअरींग लि. यांचेमार्फत सुरु असून मे, २००७ अखेरपर्यंत केवळ ३३% काम पूर्ण झाले आहे. तसेच सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग-२ चे म्हणजे मध्य रेल्वे ते राहूल नगर या भागाचे काम मे, २००४ पासून मे.गॅमन इंडिया लि. यांचेमार्फत सुरु असून मे, २००७ अखेरपर्यंत केवळ १२% काम पूर्ण झाले आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या भाग-१ व २ मधील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, अतिक्रमण निष्कासन व इतर अडचणी जवळजवळ सोडविण्यात आल्याने पुढील १६ महिन्यांत या भागांमधील उर्वरीत कामे पूर्ण करणे शक्य होईल. जागतिक बँकेने मान्य केलेल्या कर्जाचा कालावधी लक्षात घेता, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील कामे जून, २००८ पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. रस्त्याच्या विकास आराखडयातील रुंदीनुसार कामाच्या व्याप्तीमध्ये झालेला बदल, सेवावाहिन्यांचे स्थलांतर, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, आय.आय.टी. कडील व इतर जमिनींचे हस्तांतरण इत्यादी कारणांमुळे

जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-२ तसेच सांताक्रुझ-चेंबूर भाग-१ व २ चे कंत्राटदार सदर कामे नियोजित वेळेत पूर्ण करु शकले नाहीत. सदर कामे सुरु होऊन बराच कालावधी लोटल्यामुळे बाजारभावामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. म्हणून कंत्राटदारांनी नवीन दर देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार कंत्राटदारांस मुदतवाढ व दरवाढ देणे आवश्यक आहे. म्हणून जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-२ तसेच सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग - १ व २ च्या कंत्राटदारांना उर्वरीत कामांसाठी अनुक्रमे दिनांक ३१ डिसेंबर, २००८, दिनांक ३१ डिसेंबर, २००८ व दिनांक ३० जून, २००९ पर्यंत मुदतवाढ तसेच दिनांक १ जून, २००७ नंतर पूर्ण करावयाच्या कामांसाठी तसेच अतिरिक्त कामांसाठी सन २००७-०८ च्या दरसूचीप्रमाणे दर देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तसेच दिनांक १ जून, २००७ रोजी नवीन मूळ निर्देशांक गृहित धरुन पुढील कालावधीत भाववाढ कंत्राटातील अटींनुसार देण्यास मान्यता द्यावी अशीही कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली आहे. अशाप्रकारे नवीन दरसूचीप्रमाणे दिनांक १ जून, २००७ पासून पूर्ण करावयाच्या जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-२ च्या कामासाठी सुमारे रु.६६.९६ कोटी, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग - १ व २ साठी अनुक्रमे सुमारे रु.५६.९५ कोटी आणि रु.१६०.२८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

१४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०७७</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-२, सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग-१ व २ चे कंत्राटदार अनुक्रमे मे.युनिटी इन्फ्रा प्रोजेक्ट लि., मे.पटेल इंजिनिअरींग लि. व मे.गॅमन इंडिया लि. यांना अनुक्रमे दिनांक ३१ डिसेंबर, २००८, दिनांक ३१ डिसेंबर, २००८ व दिनांक ३० जून, २००९ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे.

..३१/-

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** दिनांक १ जून, २००७ नंतर प्रचलित दरसूचीप्रमाणे नवीन दर तसेच दिनांक १ जून, २००७ रोजी नवीन मूळ निर्देशांक गृहित धरुन पुढील कालावधीत भाववाढ कंत्राटातील अटीनुसार देण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग १ व ३ च्या कामासाठी ठेकेदारास मुदतवाढ देणे व त्याच्या अतिरिक्त खर्चास मान्यता देणेबाबत.**

**१५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना सह महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या भाग-१ म्हणजे पश्चिम द्रुतगती महामार्ग ते साकी विहार रस्ता व भाग-३ म्हणजे लालबहादूर शास्त्री मार्ग ते पूर्व द्रुतगती महामार्ग या भागांचे काम मे.एन.सी.सी.मेटास-महावीर (जे.व्ही.) या कंत्राटदारामार्फत हाती घेतले आहे. मूळ कंत्राटानुसार हे काम दिनांक १३ मार्च, २००५ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतू अतिक्रमणे हटविण्यामध्ये झालेला विलंब, कामाच्या व्याप्तीत झालेला बदल, सेवावाहिन्या स्थलांतरीत करण्यास झालेला विलंब इत्यादी कारणांमुळे सदर काम नियोजित वेळेत पूर्ण होऊ शकले नाही. आतापर्यंत या कामापैकी भौतिकरित्या ९५% काम पूर्ण झाले आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पातील कामे जून, २००८ पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. भाग-१ व ३ मधील उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारांनी मुदतवाढ व अतिरिक्त कामासाठी अतिरिक्त खर्चाची मागणी केलेली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सदर कंत्राटदारास मुदतवाढ व अतिरिक्त खर्च देण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार मे.एन.सी.सी.मेटास-महावीर (जे.व्ही.) यांना उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २००८ पर्यंत मुदतवाढ तसेच कामाच्या संकल्पनेत झालेल्या बदलामुळे कराव्या

..३२/-

लागलेल्या अतिरिक्त कामासाठी रु.३५.१६ कोटी इतक्या अतिरिक्त खर्चास मंजूरी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या अतिरिक्त खर्चामध्ये कंत्राटानुसार देय होणा-या भाववाढीचा म्हणजे रु.१२.०२ कोटी इतक्या रकमेचा समावेश आहे.

१५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१०७८</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-१ व ३ चे कंत्राटदार मे.एन.सी.सी.मेटास-महावीर (जे.व्ही.) यांना उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २००८ पर्यंत मुदतवाढ देण्यास तसेच या कामाच्या संकल्पनेत झालेल्या बदलामुळे कराव्या लागलेल्या अतिरिक्त कामासाठी होणा-या रु.३५.१६ कोटी इतक्या (कंत्राटानुसार देय भाववाढी धरुन) अतिरिक्त खर्चास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वर नमूद केलेल्या अतिरिक्त खर्चाशिवाय आणखी अतिरिक्त खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना याद्वारे प्रदान करण्यात येत आहेत."

**<u>बाब क्र.१६</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-१, २ व ३ आणि सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग-१ व २ च्या कामासाठी नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना मुदतवाढ देऊन त्यांच्या अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.</u>**

१६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना सह महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या भाग-१ व ३ साठी तसेच भाग-२ साठी अनुक्रमे मे.स्टुप कन्सल्टंट

प्रा.लि. व मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याच्या भाग-१ व २ साठी मे.लुईस बर्जर लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या दोन्ही रस्त्यांची कामे अद्याप पूर्ण झाली नसल्यामुळे संबंधित प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी मुदतवाढ तसेच अतिरिक्त फी देण्याची मागणी केलेली आहे. या संबंधात प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी केली असून त्यानुसार मे.स्टुप कन्सल्टंट प्रा.लि. यांना दिनांक ३० जून, २००८ पर्यंत मुदतवाढ तसेच रु.१,९९,६०,६५८/- अधिक प्रत्यक्ष सेवाकर इतकी अतिरिक्त फी, तसेच मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांना दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ पर्यंत मुदतवाढ आणि रु.२,४७,६२,१३५/- अधिक प्रत्यक्ष सेवाकर इतकी अतिरिक्त फी त्याचप्रमाणे मे.लुईस बर्जर लि. यांना दिनांक ३० सप्टेंबर, २००९ पर्यंत मुदतवाढ आणि रु.७,१९,६१,४८०/- अधिक प्रत्यक्ष सेवाकर इतकी अतिरिक्त फी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तसेच अतिक्रमण हटविण्यात होणारा विलंब, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, भूसंपादन, विविध मंडळांच्या परवानग्या, कामाच्या व्याप्तीमध्ये झालेला बदल, सेवावाहिन्यांचे स्थलांतर करण्यास झालेला विलंब इत्यादी कारणांमुळे जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता आणि सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता यांची कामे पूर्ण होण्यास विलंब झाल्यास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांस पुढील मुदतवाढी व त्या अनुषंगाने अतिरिक्त फी द्यावी लागल्यास मुदतवाढ व अतिरिक्त फी देण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करावेत अशीही विनंती कार्यकारी समितीस करण्यात आली आहे.

**१६.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०७९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-१ व ३, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-२ आणि सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता भाग-१ व २ चे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार अनुक्रमे मे.स्टुप कन्सल्टंट प्रा. लि., मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. व मे.लुईस बर्जर लि. यांना अनुक्रमे दिनांक ३० जून, २००८, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ व दिनांक ३० सप्टेंबर, २००९ पर्यंत मुदतवाढ देण्यास तसेच रु.१,९९,६०,६५८/- अधिक प्रत्यक्ष सेवाकर, रु.२,४७,६२,१३५/- अधिक प्रत्यक्ष सेवाकर व रु.७,१९,६१,४८०/- अधिक प्रत्यक्ष सेवाकर इतकी अतिरिक्त फी अदा करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वर नमूद केलेल्या मुदतवाढीनंतर काही अपरिहार्य कारणास्तव प्रकल्पाची अपूरी राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांस पुढील मुदतवाढी देण्यास व त्या अनुषंगाने अतिरिक्त फी स मान्यता देण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहेत."

**बाब क्र.१७ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्याकरीता अतिरिक्त खर्चास मंजूरी देणेबाबत.**

**१७.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना सह महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्याकरीता मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा. लि. या सल्लागारांची कार्यकारी समितीच्या मान्यतेने डिसेंबर, २००० मध्ये नेमणूक करण्यात आली आहे. त्यानंतर, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, कामाच्या व्याप्तीमध्ये बदल झाल्यामुळे सदर सल्लागारांनी करावयाच्या अतिरिक्त कामासाठी अतिरिक्त फी देण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली. दरम्यान जागतिक बँकेच्या मान्यतेने सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याची रुंदी ३० मी. ऐवजी ४५.७० मी. इतकी करण्याचे ठरविण्यात आले आहे. तसेच मध्य रेल्वेशी झालेल्या करारनाम्यानुसार रेल्वेवरपूल ते लोकमान्य टिळक टर्मिनल या पूलाचा

समावेश या कामात करण्याचे ठरविण्यात आले आहे. या अतिरिक्त कामांची संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्यासाठी मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांनी एकूण रु.३२.३४ लाख अधिक सेवाकर इतक्या अतिरिक्त फी ची मागणी केली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या प्रस्तावाची छाननी करुन पुढीलप्रमाणे एकूण रु.२९.२९ लाख अधिक सेवाकर इतकी अतिरिक्त फी सल्लागारांस अदा करण्याची शिफारस केली आहे – (१) रस्त्याची रुंदी ३० मी. वरुन ४५.७० मी. इतकी वाढविल्यामुळे नवीन जनरल ॲरेंजमेंट ड्राईंग व डिझाईन तयार करणे यासाठी रु.१४.२९ लाख अधिक सेवाकर आणि (२) रेल्वेवरपूल ते लोकमान्य टिळक टर्मिनल या पूलासाठी जनरल ॲरेंजमेंट ड्राईंग व डिझाईन तयार करणे यासाठी रु.१५.०० लाख अधिक सेवाकर. त्यानुसार मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा. लि. यांना अतिरिक्त कामासाठी रु.२९.२९ लाख अधिक सेवाकर इतकी अतिरिक्त फी अदा करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

१७.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०८० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा. लि. यांना सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्याचा सुसाध्यता अभ्यास, सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे व आराखडे तयार करण्यासाठी करावयाच्या अतिरिक्त कामासाठी रु.२९.२९ लाख (अधिक सेवाकर) इतकी अतिरिक्त फी अदा करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooooo ———